सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक १५/१०/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन गृह विभाग, शासन निर्णय क्र.पीओएस-२६२३/प्र.क्र.११०/पोल-३, दि.१४ ऑक्टोबर २०२४

**विषय :-** पोलीस आयुक्तालय,नागपूर शहर यांच्या आस्थापनेवर उपलब्ध मनुष्यबळातून नवीन भांडेवाडी पोलीस ठाणे निर्मितीबाबत

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. क्र.पीओएस-२६२३/प्र.क्र.११०/पोल-३, दि.१४ ऑक्टोबर २०२४ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४१०१४१९२२२८५७२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयनुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक लोहमार्ग,महाराष्ट्र राज्य,मुंबई
पोलीस आयुक्त, लोहमार्ग,मुंबई
कार्यासन अधिकारी, का.क्र. २६-अ

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "आस्थापना" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर यांच्या आस्थापनेवर उपलब्ध मनुष्यबळातून नवीन भांडेवाडी पोलीस ठाणे निर्मितीबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
**शासन निर्णय क्रमांकः पीओएस-२६२३/प्र.क्र.११०/पोल-३**
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई
दिनांक : १४ ऑक्टोबर, २०२४.

संदर्भ :-

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/भांडेवाडी पो.ठा./ना. शहर/४५/२०२२, दि.३१.१०.२०२३, दि. १९.१२.२०२३, दि.११.०९.२०२३.

२) पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे पत्र क्र. पोआना/जी-७/प्र.पोस्टे भांडेवाडी/सु.प्रस्ताव २०२३/६१७/१२२६/७५८/नागपूर शहर, दि. १७.०७.२०२३, दि. ४.१२.२०२३ व दि.२७.०८.२०२४

३) वित्त विभाग अनौ. सं. क्र. ५४८/२०२४/ व्यय-७ दि. १०.१०.२०२४.

प्रस्तावना :-

प्रस्तावित भांडेवाडी पोलीस ठाणे परिसरात मोठ्या प्रमाणात वसाहती / लोकवस्ती वाढत असून नागरिकीकरण देखील मोठ्या प्रमाणात होत आहे. पोलीस ठाणे पारडी व पोलीस ठाणे वाठोडा, नागपूर शहर च्या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने तसेच सद्य: स्थितीत वाठोडा पोलीस स्टेशनची लोकसंख्या १,७१,००० च्या जवळपास आहे व वाठोडा पोलीस स्टेशन हद्दीत ४ झोपडपट्ट्या व विरळ वस्त्या असल्याने गुन्हेगारीचे प्रमाण देखील जास्त आहे. सदर भागाची पूर्व-पश्चिम लांबी ६ कि. मी. पेक्षा जास्त अंतरावर असल्याने गुन्ह्यांचे ठिकाणावर पोहोचण्यास देखील जास्त वेळ लागतो तसेच गुन्हेगारीवर आळा घालणे देखील कठीण झाले असल्याच्या कारणास्तव पोलीस महासंचालक (नि. व. स), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ रोजींच्या पत्राद्वारे पोलीस आयुक्त, नागपूर, शहर यांच्या आस्थापनेवर पोलीस ठाणे पारडी व पोलीस ठाणे वाठोडा या दोन पोलीस ठाणे मधील काही भाग काढून नवीन भांडेवाडी पोलीस ठाणे उपलब्ध मनुष्यबळातून निर्माण करण्याबाबतचा सादर केलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**<u>शासन निर्णय</u>:-**

पोलीस आयुक्त,नागपूर, शहर यांच्या आस्थापनेवर पोलीस ठाणे पारडी व पोलीस ठाणे वाठोडा या दोन पोलीस ठाणे मधील काही भाग काढून नवीन भांडेवाडी पोलीस ठाणे उपलब्ध मनुष्यबळातून निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. तसेच उक्त पोलीस ठाण्याकरिता रु. ६५,१६,८००/- (रुपये पासष्ट लाख सोळा हजार आठशे फक्त) इतक्या अनावर्ती खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सदरहू खर्च मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. उपरोक्त पोलीस ठाणेकरिता हद्दनिश्चितीचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाने शासनास सादर करावा.

४. सदर शासन निर्णय हा संदर्भीय क्र.३ वित्त विभाग अनौ. सं. क्र. ५४८/२०२४/ व्यय-७ दि. १०.१०.२०२४. दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१०१४१९२२२८५७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA T BHALWANE

Digitally signed by RAJENDRA T BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA T BHALWANE
Date: 2024.10.14 19:23:34 +05'30'

**( रा. ता. भालवणे )**
**उप सचिव, गृह विभाग**

**प्रत,**

मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी,रत्नागिरी.
उप सचिव(पोल ३),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,वांद्रे,मुंबई.
वित्त विभाग (व्यय-७)/वित्तिय सुधारणा-१/आ.पु.क.
निवड नस्ती, पोल-३.